Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)with CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**विषय : गोपनीय अहवाल सन २०२०-२०२१**

विद्यापीठातील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांच्या सन २०२०-२०२१ मधील गोपनीय अहवालासंदर्भात खालीलप्रमाणे सुचना कळविण्यात येत आहेत.

१. सर्व प्रशासकीय/अधिविभागातील प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करुन आस्थापना विभागास सादर केल्याची खात्री करावी. संबंधीत प्रशासकीय विभागातील/अधिविभागातील विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांपैकी कोणाचाही गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करावयाचा राहिला असल्यास त्वरीत आस्थापना-२ विभागाशी संपर्क करावा. **(विस्तारीत दुरध्वनी क्र. ९३२४)**

२. संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या गोपनीय अहवालांची छायांकीत प्रत मिळाल्यानंतर त्या संदर्भात **अभिवेदन द्यावयाचे असल्यास ते दि. ३१/१०/२०२१ पर्यंत** संबंधीत अधिविभाग/विभाग प्रमुखांमार्फत आस्थापना विभागास सादर करावे, या कालावधीनंतर प्राप्त होणारी अभिवेदने शासन निर्णयानुसार विचारात घेतली जाणार नाहीत.

३. दि. २३/०४/२०२० च्या सुधारीत शासन आदेशानुसार प्रतिकूल स्वरुपाचे शेरे/ पदोन्नतीच्या तसेच इतर अनुषंगीक लाभांच्या आड येणाऱ्या शेऱ्यांविषयी कार्यवाहीच्या सुचना आहेत. सबब गोपनीय अहवालासंबंधी अभिवेदन सादर करताना प्रतिकूल/पदोन्नतीच्या आड येणाऱ्या शेऱ्यांविषयीचे अभिवेदन सादर करावे.

**४. वर्ग २ ते ३ मधील सर्व अधिकारी व सेवकांनी त्यांच्या गोपनीय अहवालांची ,छायांकीत प्रत खालील वेळापत्रकानुसार समक्ष मुख्य इमारत, आस्थापना - २ विभाग, खोली क्र. २२७ मधून प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पदनाम | गोपनीय अहवालाची छायांकीत प्रत स्वीकारण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | अधीक्षक/सहा.अधीक्षक/वरीष्ठ सहाय्यक | दि. २२ सप्टेंबर २०२१ |
| २ | कनिष्ठ सहाय्यक/ वर्ग २ व ३ मधील उपरोक्त पदे वगळून इतर तांत्रिक व अतांत्रिक सर्व पदे. | दि. २३ सप्टेंबर २०२१ |

**टिपः- वर्ग १ मधील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवालाच्या छायांकित प्रती समक्ष संबंधीत अधिकारी यांना शिपायामार्फत पाठविण्यात येतील.**

कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना /** 730

**दिनांकः** 20 SEP 2021

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, प्र. कुलगुरु, कुलसचिव, प्र-संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्र.वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक.
३) सर्व उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव.
४) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, जनसंपर्क अधिकारी.
५) सर्व प्रशासकीय सेवक.

**सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील/विभागातील सर्व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**